**नि.फौ.ख. क्र.२३०/२०१४**
**निशाणी क्रमांक:-२०**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ याचा शपथेवर सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री.ए. पी. नागरे यांचेमार्फत सुरु**

**देवा शपथ खरे सांगतो की,**

**माझे नाव** :- रंजन अमुत साळवी,
**वय** :- ५५ वर्षे,
**धंदा** :- पत्रकार
**राहणार** :- टिळकनगर, ता. राहाता, जि. अहमदनगर

सन २०१४ साली माझ्याकडे बजाज कंपनीची पल्सर गाडी क्र. एम.एच. १७ ए.एम ६५०२ ही गाडी होती. दिनांक २८.०६.२०१४ रोजी मी खाजगी कामासाठी लोणी येथे गेलो असता तेथुन येताना राजुरी शिवारात बाभळेश्वर ते श्रीरामपुर रस्त्यावर डाळींबाच्या बागेजवळ तिन लोकांनी मला धडक दिली. रस्त्याच्या डाव्या बाजुला त्यांनी मला धडक दिली. ते तिघे बाभळेश्वर ते श्रीरामपुर रस्त्यावरुन येत होते. मी खाली पडुन बेशुद्ध झालो. मला प्रवरा हॉस्पीटलला नेले. तेथे प्राथमिक उपचार केले. मला हाता पायाला जखमा झाल्या होत्या, रक्त येत होते. माझी गाडी रस्त्यावर घटनास्थळीच पडलेली होती. माझे नातेवाईक दुपारी ३ वाजता आल्यावर मी त्यांना सांगितले की, माझी मोटारसायकल तेथेच आहे. नातेवाईक घटनास्थळी गेले असता त्यांना माझी मोटारसायकल सापडली नाही. त्यानंतर मी लोणी पोलीस ठाण्यात गेलो. त्यांना मी घटना सांगितली. मी फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर मी वाचला आहे. तो खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २१** देण्यात येते.

२. मी पुरवणी जबाब घटनेबाबत दिला होता. पोलीसांनी तुमची गाडी सापडली असे मला कळवल्याबाबत पुरवणी जाबाबाबत मी सांगितले आहे. पोलीसांनी गाडी जप्त करुन माझ्या ताब्यात दिली. मनोज भालेराव याने गाडी चोरल्याचे पोलीसांनी मला सांगितले. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आजरोजी तो गैरहजर आहे.

३. माझी मोटारसायकल पोलीसांनी मला बंधपत्राने परत केली. आता मला ते बंधपत्र मला दाखवले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २२** देण्यात येते.

४. आता मला मोटारसायकलची पाच छायाचित्रे दाखवली. ती बरोबर आहेत.

**आरोपी व त्यांचे विधीज्ञ गैरहजर. साक्षीदाराची साक्ष फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम २९९ प्रमाणे नोंदविली.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

दिनांक :- १०/०२/२०२५

(अं. आ. कुलकर्णी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता
(न्यायालय क्र.२)